# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## देवमाता मरिया सण - ०१ जानेवारी २०२२

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः माझ्या बंधू भगिनींनो, ह्या दिवसात आमच्या तारणा-या परमेश्वराची दया आणि प्रेम आम्हामध्ये प्रकट झाले आहे. आपल्या स्वतःच्या सत्कृत्यांवर नव्हे तर अखिल मानवजातीवरील त्याच्या प्रेमावर विश्वास ठेऊन आपण आपल्या प्रार्थना परमेश्वराला अर्पण करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना देवमाता पवित्र मरिया हिच्या मध्यस्थीने आपले प्रेषितीय कार्य करण्यास कृपा आणि शक्ती मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राजकीय नेत्यांनी कोरोनामुळे विस्कळीत झालेली देशाची आर्थिक स्थिती ह्या नवीन वर्षात पूर्वपदावर आणण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. आज ख्रिस्तसभा पवित्रे मरियेचा देवमाता म्हणून विशेष गौरव करीत आहे. देवमाता मरीया आपल्या सर्वांची माता आहे. ह्या मातेच्या ममतेवर आपणास सदैव विसंबून राहता यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आजपासून सुरू होत असलेल्या नवीन वर्षात आपल्या धर्मग्रामात व धर्मप्रांतात होणा-या सर्व कार्यक्रमावर परमेश्वराचा विशेष आशीर्वाद असावा म्हणून आपण प्रार्थना करू या

५. प्रभूच्या सामर्थ्यशाली कृपेने आपल्याला चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी, कोरोनो विषाणूपासून व सर्व नैसर्गिक आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे प्रभो परमेश्वरा, प्रेमाने आणि आपले कौमार्य न गमावता मरियेने आमचा प्रभू आणि तुझा पुत्र येशू ख्रिस्त ह्याला जन्म दिला. तिला आमच्या प्रार्थना तुझ्यासमोर सादर करू दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.